# स्टेट बँक ऑफ इंडियाला जेट एअरवेजचा पुळका का येतो?

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडे

केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळात खाजगीकरण आणि भांडवलशाही फोफावत गेली. खाजगीकरण योग्य की अयोग्य यावर प्रचंड वाद होऊ शकतो, पण एकदा खाजगीकरण स्वीकारले तर बुडत्या काळातही त्यावर ठाम राहायला पाहिजे. मात्र प्रत्यक्षात तसे घडत नाही. खाजगीकरण आणि भांडवलशाहीचे मायबाप असलेल्या अमेरिकेतही ते घडले नाही. अमेरिकेतील खाजगी बँका कोसळल्या तेव्हा खाजगीकरणाच्या धोरणानुसार त्या बँकांचा शेवट होऊन त्यांना मूठमाती देता आली असती. परंतु सामाजिक हित लक्षात घेऊन या बँकांना सरकारी भांडवल देऊन वाचविण्यात आले. त्यामुळे खाजगीकरणाचा डंका पिटणाऱ्या अमेरिकेत खाजगी क्षेत्र वाचवायला सरकारी कुबड्या लागतात, ही बाब वारंवार स्पष्ट झाली असूनही खाजगीकरणाचा उदोउदो करून जे जे सरकारी आहे




ते कुचकामी, अकार्यक्षम, बेशिस्त असल्याचे दाखविण्याचा उद्योग भांडवलशाही करते. प्रत्यक्षात सत्य हे आहे की, सरकारी आशीर्वादाने भांडवलदार आणि खाजगी कंपन्या सरकारचा पैसा वापरून तग धरतात आणि या खाजगी कंपन्यांना वाचविण्यासाठी ज्या सरकारी कंपन्या/उद्योग दावणीला बांधले जातात ते मरतात. मग पुन्हा सरकारी कंपन्या बेकार आहेत म्हणून बोंब सुरू होते. खरी मेख काय आहे ते अत्यंत शिताफीने दडवले जाते.

आज भारतात सरकारी बँका जर बुडल्या असतील तर त्या खाजगी उद्योग आणि भांडवलदारांना दिलेले अब्जावधीचे कर्ज बुडले म्हणून बुडाल्या आहेत. सामान्य माणसाने कर्ज मागितले की, त्याचे मूळ कागदपत्र बँका जप्त करतात आणि मग आपली मालमत्ता जप्त होईल या भीतीने तो बिचारा प्रत्येक हप्ता भरत राहतो, पण विजय मल्ल्याला काही तारण न ठेवता कर्ज मिळते. चोक्सी एकाच जमिनीच्या तुकड्यावर दहा बँकांकडून कर्ज घेतो आणि पसार होतो. व्हिडिओकॉन कंपनी देना बँकेचे कर्ज बुडवून बँकेला अस्थिर करते. या सर्व बाबी सहजी घडत नाहीत. यात बँक अधिकारी आणि भांडवलदार यांचे शंभर टक्के साटेलोटे तर असतेच, पण सरकारी पातळीवरूनही तितकाच दबाव असतो. हे चांडाळ त्रिकूट वाटेल ती कर्ज द्यायला भाग पाडते आणि त्यांच्यामुळे बँका बंद पडल्या की सर्वात मोठा फटका त्या बँकांतील सामान्य खातेदाराला बसतो. ही जी सर्व बुडित कर्जाची प्रकरणे आहेत त्याला सर्वाधिक जबाबदार कोण असेल तर गैरव्यवहार करण्यास दबाव टाकणारे सरकार आहे. आधीचे सरकार असो वा आताचे सरकार असो चांडाळ त्रिकूट कार्यरत आहेच.

या त्रिकुटाच्या उद्योगाचे सर्वात ताजे उदाहरण म्हणजे जेट एअरवेज आणि सरकारी स्टेट बँक ऑफ इंडियाचे साटेलोटे हेच आहे. जेट एअरवेज बुडित आहे. या कंपनीने अनेक बँकांकडून घेतलेले ८,४०० कोटीचे कर्ज बुडविले आहे. नेहमीप्रमाणे कंपनीने हात वर केले आहेत. त्यांना कर्ज देणाऱ्या छोट्या बँकांनी जेट एअरवेजची विमाने जप्त करून त्याच्या विक्रीतून वसुली करण्याचे ठरविले आहे. पण आपल्या सरकारी स्टेट बँकेने त्यांना मुक्त हस्ते कर्ज देऊन ठेवले आहे. त्या कर्जापोटी आवश्यक तारणही घेतलेले नाही. आता हे कर्ज बुडित झालेले आहे. म्हणजे स्टेट बँकेने सामान्य ठेवीदारांनी बँकेत ठेवलेले पैसे जेट एअरवेजच्या घशात घातले.

आता जेट एअरवेजचे कर्ज बुडित झाले हे लक्षात आल्यावर त्या कंपनीची मालमत्ता जप्तीची प्रक्रिया करायला हवी. पण स्टेट बँकेला या कंपनीचा जास्तच पुळका आलेला दिसतो आहे. चांडाळ त्रिकूट कामाला लागले आहे. सरकारी बँकेचे बुडित कर्ज वाढले तर त्याचा बँकेच्या अधिकाऱ्यांना त्रास होणार नाही, भांडवलदार कंपनीला त्रास होणार नाही. मग वसुलीची फिकीर कशाला करायची? स्टेट बँकेने तर वसुली सोडून बुडित जेट एअरवेजला मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी स्टेट बँकेचे जितके कर्ज जेट एअरवेजने बुडविले आहे, तितक्या किमतीचे जेट एअरवेजचे शेअर ही बँक विकत घेणार आहे. म्हणजे जेट एअरवेजच्या एकूण शेअर्सपैकी १५ टक्के शेअर स्टेट बँक विकत घेणार आहे. ज्या जेट एअरवेजचे ८,४०० कोटी रुपये थकले आहेत अशा बुडित कंपनीचे शेअर कुणी विकत घेईल का? शेअर बाजारात गुंतवणूक करणारा एकही भांडवलदार हे शेअर विकत घ्यायला पुढे येत नाही. पण स्टेट बँक ही सरकारी बँक आहे त्यामुळे तिला दावणीला बांधा, कसेही हाका आणि खाजगी जेट एअरवेज वाचवा, हा प्रकार होणार आहे. इतके शेअर घेऊनही जेट एअरवेज बुडली की स्टेट बँकेला अकार्यक्षम ठरवायचे, त्यावर प्रशासक बसवायचा आणि सामान्य माणसांच्या ठेवी अडवून ठेवायच्या हा उद्योग आहेच.

स्टेट बँकेच्या सामान्य ठेवीदारांनी जागे होऊन याला विरोध करायला हवा. नाहीतर आणखी एक सरकारी उद्योग 'अकार्यक्षम' ठरवून सगळे मोकळे होतील.